
ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal



*Chief Editor*

**Dr Kalyan Gangarde**

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

## Contents

### I. POEMS

1. Aju Mukhopadyay - I Walk Or I Walk Me?
2. Dr Mahendra Shinde - And They Call Me…
3. Dr Mukund Rajpankhe - Reign Oh Rain
4. A.S. Ratnam- Adarsh

### II. ARTICLES

1. The Agony of Tribal Life - **Aju Mukhopadhyay** | 08
2. Environmental Pollution: Its Effect On Human Population - **Smt. Madhubala Sarojini** | 17
3. *Wuthering Heights* as Metaphysical Romance -**Dr Chung Chin-Yi** | 20
4. A Study Of Kamala Das's Poetry - **B.N. Wakchaure** | 23
5. Shiv's Loona : Embracing Her Identity From The Mythical Demonic Discourse - **Reetu Aggarwal** | 33
6. वारकरी चळवळ : एक चिंतन - **डॉ. सर्जेराव जिगे** | 37
7. मराठी पत्रकारिता आणि सामाजिक वास्तव - प्रा.डॉ.सा.द.सोनसळे | 42

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

# The editors have retained the documentation methods employed by the respective authors.

Late Ramrao Patil (ACS) College, Sonpeth, Dist. Parbhani

7

# मराठी पत्रकारिता आणि सामाजिक वास्तव

**प्रा.डॉ.सा.द.सोनसळे**
सहयोगी प्राध्यापक मराठी
रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ जि.परभणी

प्रसार माध्यम आधुनिक कालखंडातील मानवी प्रगतीचे प्रज्ञाचक्षु आहेत. असा साधार समज आहे. ब्रिटीशांच्या आगमना बरोबर जसे त्यांचे राजकारण, समाजकारण,धर्मचिंतन,साहित्य आले. तव्दवतच त्यांच्यामुळे आपल्या देशात वृत्तपत्रही आले. भारतीय माणूस जसा शिकू लागला. तसा या समाज व्यवस्थेत बदल होवू लागला. त्या बरोबर सांगावा सांगणारा खब–या वार्ताहर झाला. आणि खबर लिहीणारा बखरकार संपादक झाला.

प्राचिन आणि मध्ययुगीन समाजव्यवस्थेत पत्रकारीतेचे तातू वेगळया नव्या रूपाने अस्तित्वात होती. सांगावा सांगणारा महार हा दैनिक वृत्तपत्राची भूमिका पार पाडत होता. तर 'दवंडी' देणारा मातंग हा 'मासिक' पाक्षिकाची भूमिका पार पाडत होता. 'भाट' हा मासिक त्रैमासिकाची भूमिका पार पाडत होता. 'पांगूळ', किर्तनकार','कुडमुडया जोशी', वासुदेव', नंदीबैल वाले भिकारी आपल्या राजाला माहिती देणारे गुप्तहेर होते. ते जणू तंतोतंत माहिती पुरविणारे विविध चॅनल्स होते. परंतु त्यांच्या कामगिरीचा मोबदला मात्र शिळंपांक अन्न, फाटके वस्त्र, आणि गावभर पोटसाठी भीक मागण्याची राजाकडून परवानगी होती. आलेली ही माहिती राजदरबरात बसून ग्रंथीत करणारा ब्राम्हण वर्णातील सारस्वत वगैरे जातीचा माणूसमात्र प्रतिशठीत पुरस्कार प्राप्त मोठा सधन सुखात जगत असे. तो आजच्या वृत्तपत्राच्या मुख्य संपादकाचा पूर्वज होय. प्राचिन भारतातील पत्रकारीता अशी नांव आणि रूपं वेगळी असलेली होती. माहिती जमवणारे खबरे ईमाने इतबारे माहिती द्यावयाचे पण, दरबारात लिहीणारा बखरकार खबरीला कधी कधी आधी मधी उलटे करायचा आणि अनेक अनर्थ घडायचे म्हणून तर आज इतिहासातील काही नोंदी विशयी शंका घेतली जाते. हे पूर्णांशाने सत्य नसले तरी त्यातला तथ्यांश नाकारता येत नाही. ही वस्तुस्थिती आहे. असो.

आता आपण ब्रिटीशांच्या कालखंडातील वृत्तपत्रीय टप्पांख सारांश लक्षात घेवू. ब्रिटीश हे लोकशाहीवादी होते ही आपली समज अर्धसुत्य अधोरेखीत करणारी आहे. कारण विसाव्या शतकाच्या आरंभीच्या पंचविस वर्शापर्यंत ब्रिटीश स्त्रिला मत स्वातंत्र्य नव्हते. जेंव्हा या देशात राश्ट्रपिता कांतिबा फुले स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा रणसंग्राम लढत होते. त्याच्या सत्तर पंच्याहत्तर वर्शानंतर ब्रिटीशांनी स्त्रियांना स्वातंत्र्य दिले. किंबहूना हिंदू स्त्रिच्या या स्वातंत्र्य चळवळीचा परिणाम पडला आहे. असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे ठरू नये. आणि म्हणून आधुनिक कालखंडात स्त्री दुःखची आणि दास्यांची पहिली खबर (बातमी ) ज्योतिबा फुलेंनीच पुण्याच्या चौका चौकात सांगितली ही आधुनिक पत्रकारितेची सुरूवात समजावी.

मराठीतील सामाजिक वृत्तपत्राची प्रेरणा ज्योतिबा फुले आहेत. कांतीवीर ज्योतिबा फुलेंच्या वैचारिक आणि कृतिशील चळवळीतून ब्राम्हणेत्तर वृत्तपत्रांचा जन्म झाला. काळाशी ते सुसंगत होते. त्या काळाची ती गरज होती. दोन, दुःखी आणि अस्पृश्य समाजाचे शिक्षण क्षेत्रात जो पर्यंत शिक्षक येत नाहीत तोपर्यंत शुद्रातिशुद्र समाजाला शिक्षणाचे महत्व कळणार नाही. तव्दवतच ब्राम्हणेतरांची स्वतंत्र वृत्तपत्रे आल्याशिवाय

त्यांच्या विश्वाला कुणी अधोरेखीत करणार नाही. हीच ती प्रेरणा मराठीतील सामाजिक वृत्तपत्राला पुढे कारणीभूत ठरली असावी असे वाटते.

ब्रिटीशांच्या काळात मराठी वर्तमान पत्राला सुरूवात होण्याअगोदर एका ब्रिटीश व्यक्तिनेच इथे हिंदी मधून सर्वप्रथम वृत्तपत्र सुरू केले. आणि वैचारिक मंथनाला सुरूवात झाली. याविशयी डॉ. गंगाधर पानतावने आपल्या संशोधनात म्हणतात " जेम्स हिकी या ब्रिटीश व्यक्तीने आपल्या 'बेंगाल गॅझेट' या पहिल्या हिंदी पत्रात निर्भयपणे आपले मत प्रतिपादन करून राजकिय व व्यावसायिक स्वातंत्र्याचा उच्चारच केला होता. अन्यायाविरूध्द झुंज देणे, अन्यायाला वाचा फोडणे हा आद्य हिंदी पत्राचा पवित्रा दुर्लक्षणीय खासच नाही." 1 इथूनच वृत्तपत्रीय वैचारिक मंथनाला सुरूवात झाली. हिंदुस्थानचा माणूस वाचायला लिहायला लागला तिथूनच मानवाच्या सामाजिक स्वतंत्र्याची भूमिका अविश्कृत होत गेली. तेच लोण हळूहळू मराठी माणसापर्यंत आले. सुरूवातीचा उच्चभ्रू लोकांचा जातीय दृश्टिकोण संकुचित जरी असला तरी हळूहळू पुढे वृत्तपत्रातून विचार मंथन होवू लागले. साहित्यिक सामाजिक भान ठेऊन पुढे इतर समाजाच्या भावभावनांचा विचार होवू लागला हा मराठीतील वर्तमान पत्र, पाक्षिक, मासिकांच्या भूमिकांचा आहे.

मराठीमध्ये बाळशास्त्री जांभेकरांचे 'दर्पण' पत्र 06 जानेवारी 1932 मध्ये आले. सुरूवातीला एका जात समुहाच्या लेखक वाचकासाठी निघालेल्या या वृत्तपत्रात जातीय अहंता, स्वार्थ, विशयांची मर्यादा घेवून क्वचित राश्ट्रीय अभिनिवेशाने निघालेले ब्राम्हण जात नव्हे वर्णातील लोकांसाठी वैचारिक, साहित्यिक मेजवाणी टणारे होते. जांभेकरांनी मराठी भाशा आणि संस्कृतीची मांडणी करतात शब्दबंबाळ आणि शाब्दिक चमत्कार करण्यातच या वृत्तपत्राने आपली वाटचाल केली. एका जातीचं सुध्दा दुःख ते मांडू शकले नाही ही वस्तुस्थिती आहे. पुढे तो गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी यांचे 'शपथपत्र' भाऊ महाजनांच्या प्रभाकर मधून सामाजिक दुःख प्रश्न येवू लागली.भाऊ महाजनांचे प्रभाकर हे वृत्तपत्र 24 ऑक्टोबर 1841 मध्ये सुरु झाले. सामाजिक प्रश्नांची उकल याही वृत्तपत्रातून होत होती. लोकहितवादींच्या शतपत्राने सामाजिक दुखणे ओळखले आणि त्यावर दवापाणी सांगू लागले पण प्रस्थापित समाज व्यवस्था लोकहितवादांच्या विचाराचा विरोध करीत होती. ब्राम्हण स्त्रियांच्या अन्याय अत्याचाराबद्दल ज्योतिबा फुलेंनी सर्व प्रथम विचार मांडले आणि तेच पुढे सामाजिक वृत्तपत्रांना बळ देणारे ठरले. भाऊ महाजनांच्या प्रभाकरातून आलेले विचार हे समाजाच्या हिताचे होते. याबाबतीत प्र.न. जोशी यांचे मत महत्वाचे वाटते. "चटकदार शैली आणि सामाजिक सुधारणेची आवड यामुळे प्रभाकर लोकप्रिय झाले. लोकहितवादी यांची शतपत्रे याच प्रभाकर मधून प्रसिध्द होत असत. 2 समाजाची विविध अंगांनी सुधारणा व्हावी. भोळा भाव नश्ट व्हावा आणि खऱ्या ज्ञानाची उपासना सुरु व्हावी या दृश्टिने लोकहितवादींची पत्रे म्हणजे या काळातील लहान लहान निबंधचख होत." सामाजिक प्रश्नांच्या मांडणीची सुरूवात लोकहितवादींच्या या पत्रातून झाली. समाजमन खडबडून जाग होवू लागलं. बुरसटलेल्या विचारांनी लोकहितवादींना विरोध करायचे पण सामाजिक दूरदृश्टीपणाची जाणीव असणारे लोकहितदावादी दबले नाहीत. त्यांची लेखणी प्रश्न मांडतच राहिली.

1867 'मध्ये विविध विस्तार' आणि 1874 मध्ये विश्णुशास्त्री चिपळूणकरांची निबंधमाला निघाले. वैदिक संस्कृतिची पाठराखण करताना विश्णुशास्त्री चिपळूणकर मोठे आकमक व्हायचे. मराठी भाशा ही आपली मक्तेदारी आहे या अविर्भावात ते इतर जातिच्या लेखकांवर तुटून पडत. ज्योतिबा फुले यांना मराठी भाशेचे व्याकरण जमत नाही. तेंव्हा त्यांना चौथीच्या वर्गात नेऊन बसवावे असेही त्यांनी विचार मांडले मराठी भाशा लिहीतांना ऱ्हस्वदीर्घाची, आकार उकाराची काडी इकडे तिकडे जाता कामा नये. असा त्यांनी दंडकच घातला होता. चिपळूणकरांच्या या वृत्तीबद्दल प्र.न. जोशी म्हणतात. "विश्णुशास्त्री चिपळूणकर यांची लेखणी फार तिखट होती ज्योतिबा फुले आणि लोकहितवादी यांच्यावर मोठी घणघाती टीका त्यांनी केली. आणि पुढील

काळात विचारवंतांचा रोश ओढवून घेतला." (3) सामाजिक सुधारणे विशयी घृणा असणा—या चिपळूणकरांनी लोकहितवादीच्या शतपत्रातील विचारांनाही विरोध केला.

वृत्तपत्रांची मूळभूमिका माणसांच्या समस्या आणि प्रश्न मांडणारी असावी. तेच खरे उदि्दश्ट समाजाला विकासप्रत घेवून जावू शकते. चैन मौज ही संपलेल्या प्रश्न समाजाची गरज असते. उपेक्षित सामाजाची कढ घेणारी दुःख दीनांबददल कणव येणारी वृत्तपत्रे समाजात निर्माण झाल्याशिवाय समाजक्रांती यशस्वी होवू शकत नाही. डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात " समाज सुधारणे बरोबरच समाजनिर्मीतीची प्रतिज्ञा वृत्तपत्र करीत असल्यामुळे संघर्शसन्मुखता स्वीकारावीच लागते. शोशण, दासता, हुकूमशाही या विरूदध जहाल रूप धारण करावेच लागते. परंतू हे सर्वकाळी घडतेच असे नाही. पुश्कळदा आपल्या स्विकृत कार्यापासून विन्मुख होऊन तत्वच्युती आणि लाचारी स्विकारणारी पत्रे मानवी कलह आणि नैतिक अधःपतनाला कारणीभूत ठरतात." 4 आधुनिक पत्रकारीतेला अधोरेखित करणारे विचार वाटतात.

भारतीय पारतंत्र्याची जाणीव माठया प्रमाणावर होत असताना त्या त्या कालखंडाला अनुसरून एक एक वृत्तपत्र निघत असतात. त्यातील विचार सुध्दा परिस्थिती सापेक्षच असतात. समाजमनाचे प्रतिबिंब सहाजिकच वृत्तपत्रातील आशय विशयातून पडत असते. अशाच पार्श्वभुमिला समोर ठेवून टिळकांनी 1881 साली 'केसरी' वृत्तपत्र काढले पण या वृत्तपत्राचे मुळात ध्येयच राजकीय स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. इंग्रजांच्या जुलूम अत्याचारावर प्रहार करणारे होते. दुसरे असे की इंग्रजांवर प्रहार करताना एत्तदेशीय स्त्रियांवर, अस्पृश्यांवर टिळकांचा समाज जो अन्याय, अत्याचार, अपमान, शोशण करत होता त्याकडे मात्र केसरी कानाडोळा करत होती. अशा वेळी समाजसुधारणा ही झालीच पाहिजे स्त्रियांचे दुःख मांडले पाहिजे यासाठी गोपाळ गणेश आगरकरांचा 'सुधारक' निघाला. त्याकाळात ब्राम्हण स्त्रियांवर ब्राम्हण कुटुंबात अन्याय,अत्याचार होत होते. क्रांतीबा ज्योतिबा फुलेंच्या सामाजिक विचाराने रान पेटले होते. ब्राम्हण विधवा स्त्रियांचा प्रश्न,केशवपण,सतीची प्रथा, हया सर्वप्रथा प्रामुख्याने ब्राम्हण समाजातच होत्या. विधवा ब्राम्हणस्त्रियांवर त्यांच्या कुटूंबातील वडिल, भाऊ,चुलत भाऊ, काका बलात्कार करत असत. त्यातून दिवस गेले की अशा स्त्रियांना आत्महत्या करण्याशिवाय पर्याय राहायचा नाही. मग ज्येतिबा फुलेंनी ब्राम्हण स्त्रियांचे केशवपण करणा—या न्हाव्यांचा संप घडवून आणला. स्त्री शिक्षणाला सुरूवात केली ह्या प्रेरणा घेऊन आगरकर सुधारकात लिहू लागले. त्यामुळे आगरकरांना खुप त्रास झाला.

याच काळात वाड्•मयीन पत्रातून कथा कादंबरी यायची. ही वृत्तपत्रातून मध्यम वर्गीयांची भूक क्षमवित असत. अशा वेळी तळागाळातला कोट्यावधी समाज हा अज्ञान, धर्मांध रूढीच्या परंपरेच्यावर व चिखलात रूतून बसला होता. त्यांना वर काढून माणसांचे हक्क प्रदान करण्यासाठी, अशा कणा मोडलेल्या माणसांना ताठमानेण जगण्यासाठी मानवमुक्तिचा रणसंग्राम वृत्तपत्रांतून लढला तो डॉ. बाबासाहेब आंबेडकर, केशवराव जेधे,जवळकर, भास्करराव जाधव, श्रीपादराव शिंदे, वि.रा.शिंदे यांनी नियतकालीकातून सामाजिक संघर्श पेटविला आणि सामाजिक मूल्यासाठी लेखणी झिजविली.

क्रांतीवीर जोतीबा फुलेंची प्रेरणा असलेल्या ब्राम्हणेतर वृत्तपत्रातून पुढे समाज प्रबोधनाचे कार्य मोठया प्रमाणावर झाले. "ब्राम्हणेत्तर वृत्तपत्रे ही एक अपरिहार्य गरजेतून जन्माला आल्यामुळे शेतकरी कश्टकरी यांच्या जीवन मरणाच्या आणि धार्मिक शोशणाचा समाचार घेउन त्यास कारणीभूत असणाऱ्या वृत्तीप्रवृतीचा शोध घेण्यासाठी दीनबंधू, दीनमित्र, शेतक—यांचा कैवारी, अंबालहरी, विजयी मराठा, या सारख्या, ब्राम्हणेतर पत्रांनी आपली लेखणी परजली. त्यामुळे ह्या पत्रांना त्याकळी विरोधही फार मोठया प्रमाणात झाला. ब्राम्हण आणि ब्राम्हणेत्तर पत्रे यात सतत संघर्श टाका प्रतिटीका होत होती. ब्रम्हणंनी वृत्तपत्रांना स्वीकारलेली जबाबदारी पार पाडत होते. हीच तर वृत्तपत्र व्यवसायातील नैतिकता होती. ब्राम्हणेतरामध्ये प्रामुख्याने अस्पृश्यांनी हया क्षेत्रात मोठया ध्येयवादातून सुरूवात केली. गोपाळबाब वलंगकर यांनी डॉ. बाबासाहेब

आंबेडकरा सारखे कार्य त्यांनी वृत्तपात्रातून केले. अल्पशिक्षित असलेल्या गोपाळबाबाचे वाचन चौफेर होते. इतिहास, धर्म समाज संस्कृतीचे चिंतन करून त्यांनी अस्पृश्यांच्या गुलामगिरी विशयी ठोस भूमिका घेतली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'मूकनायक' 1920, बहिश्कृतभारत 1927, 'समता' हे समाज समता संघाचे मुखपत्र होते. '' मुकनायकाने अस्पृश्यांनासाठी नवे विचारयुग निर्माण केले हया शंका नाही. बाबासाहेबांनी अस्पृश्यांना त्यांच्या अस्तित्वाची व भवितव्याची जाणीव करून देणारे साधन म्हणुन वृत्तपत्राकडे पाहिले.''6 या मुकनायकाच्या अग्रलेखाच्या शिरोभगी संत तुकरामाचा प्रसिध्द अभंग, लिहीत असत. '' काय करू आता धरूनीया भीड । निःशंक हे तोंड वाजविले ।। नव्हे जगी कोणी मुकीयांचा जाण सार्थक लाजून नव्हे हित ।।२ 7 डॉ. बाबासाहेब आंबेडकर वृत्तपत्राविशयी म्हणतात'' ''आमच्या या बहिश्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणा-या अन्यायावर उपायायोजना सुविण्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या ख-या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी अन्यभूमीच नाही.''8 डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या सर्वच वर्तमान पत्रातून संबंध अस्पृश्य बहुजन समाजाच्या दुःख, दैन्य अवस्थेवर मोठया पोटतिडकीने लिहित. हया दैन्य अवस्थेला इथला हिंदूधर्म आणि त्यांची जातीविशमता कशी कारणीभूत आहे हे मांडत असत. बाबासाहेबांनी समाज सेवेचा वसा घेतल्यामुळे त्यांची लेखणी इथल्या रंजल्या गांजल्या उपेक्षीत माणसांसाठी उपेक्षीत शोशीत स्त्रियांसाठी सतत कार्यरत राहीली. हा सर्व उहापोह यासाठी की आधुनिक वृत्तपत्र काढणे, चालवणे हयाचे स्वरूप कसे आहे हे तपासणे सोपे जाते.

आधुनिक काळात वृत्तपत्र काढणे ही एक फॅशन झाली आहे. संपादक होउन मिरवणे ही हौस निर्माण झाल्यामुळे आपल्या लेखणीचे कर्तव्य ते विसरत आहेत. हे सर्व काही अपवाद वगळून मांडत आहे. वृत्तपत्र काढणे जशी फॅशन आहे तसा तो एक व्यवसायही झाला आहे. रोज नव्या नव्या व्यवसायांची भर पडते आहे. तशी वर्तमान पत्र हा व्यवसाय म्हणून पहात असल्यामुळे कधीकाळी केवळ समाजप्रबोधनाची भूमिका बजावत असलेल्या ह्या क्षेत्रात आज केवळ पैसा कमविण्याचे साधन, कोणत्याही प्रतिशठीत माणसाला ब्लॅकमेल करण्याचे माध्यम आणि गुंड, गुन्हेगारांचे उदात्तीकरण करण्याचे अड्डे झाले आहेत. एखादाच संपादक दुःख दैन्य, वेठबिगार, भुके कंगाल, बेरोजगार, विस्थापीत, भटके विमुक्त, यांच्या जीवनाच्या संदर्भात चिंतन करत असतो.

आजच्या वर्तमान पत्रांचे राजकारण चालू असते. राजकारणी एखाद्या पत्रकाराला आपलंस करून हव्या अशा बातम्या छापून घेतो आणि प्रतिस्पध्र्याचि मुद्दे सत्याजरी असले तरी त्या मुद्यांना फाटा देतो. अशा परिस्थित एखाद्या पक्षांचे ते मुखपत्र समजले जाते. उदा. 'सामना' हे शिवसेना ह्या पक्षाची तरफदारी करते. तर तरूण भारत भा.ज.पा. रा.स्व.से. संघाची बाजू मांडते. लोकमत कॉंग्रेस धार्जिन धोरण स्वीकारते तर, 'सम्राट' रिपब्लिकन आणि आंबेडकरी चळवळीची बाजू मांडते. अशीच इतरही वृत्तपत्रांची स्थिती आहे. सर्व समावेशक बाजू ह्या वृत्तपत्रात आज घडीला सापडत नाही. त्यामुळे समाजातील जातीयता, धर्मांधता, अंधश्रध्दा कळत नाही. दीन-दुबळयांच्या प्रश्नांना जातीपातीच्या पलिकडे जावून कुणी मांडत नाही.

वृत्तपत्र लोकप्रबोधनासाठी कार्य करावे असा आदर्श संकेत आहे. पण सवंग लोकप्रियतेसाठी उत्साही पत्रकार समाजात नको त्या बातम्या पसरविण्यासाठी धर्मांधता, अंधश्रध्दा पसरवणाऱ्या बातम्या मुददाम छापतात. उच्चभ्रू लोकांच्या सोयरीकीपासून, हनीमून, बाळांतपण, बाळांतपणाच्या काळात, जन्मलेले मूल, दुसरे लग्न, घटस्फोट, पत्नीचा दुसरा नवरा आणि तिसरा मित्र, नवऱ्याच्या पत्नी सोडुन इतर बायका, कुणाचे कुणासोबत लफडे आहेत. त्यांच्या पाटर्या, हया सर्वच बाबी आजचे वृत्तपत्र मोठया चवीने चघळत असतात. इलेक्टॉनिक मिडीयातर दिवसभर कुठल्याना कुठल्या बातमीला सतत दाखवून डोक्यावर हॅबरींग करीत असतात. अनेक वृत्तपत्रे हे निव्वळ शब्दकोडे, राशी भविश्य, चित्रपटातील नटयांचे अर्धनग्न फोटो छापत

असतात. माता पित्याने मारून टाकलेल्या मुलांच्या बातम्या दिल्या पाहिजेत असे वाटते. एखाद्या राष्ट्रीय प्रश्नावर रान उठवत नाहीत. आपल्या मालक पक्षाच्याअहिताची बाजू मांडत नाहीत.

आधुनिक काळात पत्रकारीता ही खाबूगीरी झाली आहे. अडगळीत पडलेल्य नेत्यांचे अमाप पैसे घेउन त्यांच्या वाढदिवसाच्या पुरवण्या काढण्यात पत्रकार गर्क आहेत. भ्रश्ट संस्थाच्या जाहिराती, भ्रश्टमाणसांच्या मोठेपणाचे गोडवे गाणारे पत्रकार आहेत. म्हणून या क्षेत्रात हाणामारी आता अंगवळणी पडली आहे. प्रसिध्दीसाठी आपल्याच वृत्तपत्राची होळी करण्याचाही प्रसंग कधी कधी घडत असतो. चमचेगीरी, हुजरेगीरी करणारे अनेक वार्ताहर खबरे पत्रकारीतेतले ढेकळं कळत नसलेले कुणाचीही रि ओढत असतात. कुण्याही माणसाला त्रास देत असतात.

आणि म्हणून ह्या वर कुठेतरी बंधन आली पाहिजेत ''प्रसार माध्यमांचे वर्तन सध्या आक्षेपार्हच नव्हे, तर संतापजनक होत चालले आहे. सर्व समाजाला अक्कल शिकविण्याचा ठेका घेतल्याप्रमाणे या 24 तास चालणा–या वाहिन्या वागत असतात. आणि समाजकारण राजकारणातील माणसे कशाला माध्यांच्या वाकडयात जायचे म्हणून अनेकवेळा गप्प बसतात. पण आता मात्र या वाहिन्यांचा निर्लज्जपणा इतका वाढतो आहे की, समाजाने त्यांचा कान धरून या माध्यमांना त्यांच्या चुका दाखवून न थांबता त्या मान्य करणे भाग पाडले पाहिजे'' 9 ही या क्षेत्रात वाढलेली खाबुगिरी, खाउगीरी आहे. ती दिवसेंदिवस वाढते आहे.

पत्रकारा एवढा लबाड माणूस नाही ही अवस्था दुदैवाने खरी ठरत आहे. तर दुसरीकडे चांगल्या पत्रकाराला जगू दिले जात नाही. हे वास्तव आहे. गल्लोबोळातून रोज निघणारे वृत्तपत्र आणि उत्साही संपादक कुणाची तरी हमाली करतात. पैशामुळे कुणाची तरी गुलामी स्वीकारतात. या व्यावसायात आर्थिक संकट आहेत म्हणून गायीने वासरू खाने कितपत योग्य आहे. समाजस्वस्थासाठी झुंज देणारे पत्रकार आणि नाहीरे गटाचे प्रतिनिधीत्व करणारे वर्तमान पत्र निघाले तरच मानवतेवर विश्वास राहील.

## संदर्भ


1. डॉ. गंगाधर पानतावणे – पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर पृ.07
2. प्र.न. जोशी – अर्वाचीन मराठी वाड्.मयाचा इतियास 1800 ते 1960 पृ.80
3. कित्ता – पृ.80
4. डॉ. गंगाधर पानतावणे – पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर पृ.06
5. कित्ता – पृ.13
6. कित्ता – पृ.58
7. संत तुकाराम – डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिश्कृत भारत आणि मुकनायाक पृ.46
8. डॉ. बाबासाहेब आंबेडकर – मूकनायक 31 जानेवारी 1920 पृ. 46
9. समीरण वाळवेकर – वृत्तवाहिन्यांच्या बेजबाबदारपबाला वेसण घाला. सकाळ 'सप्तरंग' दि.27 / 11 / 2011


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani